पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११०१८

**मा.इ प्रभाग समिती**

कार्यपत्रिका क्रमांक- १०

सभावृत्तांत

दिनांक -१६/०१/२०१७ वेळ – सकाळी ११.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मा.सभापती निवडीची सभा **सोमवार दिनांक १६/०१/२०१७ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी १२.०० वा.** महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील मा. महापौर कै.मधुकर रामचंद्र पवळे सभागृहात श्री.नितीन पाटील पिठासन अधिकारी आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे -१ यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करणेत आली होती . सदर सभेस खालील सन्मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा.आल्हाट मंदा उत्तम
२. मा.वाबळे संजय मल्हारराव
३. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडूरंग
४. मा.सुपे आशा रविंद्र
५. मा.गोफणे अनुराधा देविदास

याशिवाय मा.श्री. चंद्रकांत इंदलकर - क्षेत्रीय अधिकारी, इ क्षेत्रीय कार्यालय, श्री.श्रीनिवास रा.दांगट- सभा सचिव तथा प्रशासन अधिकारी इ क्षेत्रीय कार्यालय हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**पिठासन अधिकारी आयुक्त - अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे -१.** सन्मा.सदस्य ,उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करतो आजच्या सभेत मा. इ प्रभाग समितीचे सभापती पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. त्यासाठी मा. विभागीय आयुक्त यांनी सभेचा पिठासीन अधिकारी म्हणून माझी या ठिकाणी नेमणूक केलेली आहे. मा.इ प्रभाग समितीच्या सभापती पदाची निवडणूक मुक्त व निर्भयपणे पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेणेबरोबरच त्या कामकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे.
**सचिव यांनी कामकाज सुरु करावे अशी सूचना करते.**

**मा.प्रशासन अधिकारी तथा-सचिव(सभाशाखा )** मा. इ प्रभाग समितीचे सभापती पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २९ अ (४) नुसार नेमणुक करणेकामी एकूण १ नामनिर्देशन पत्रे मुदतीत दाखल झालेले आहे. त्यामधील उमेदवार, त्यांचे सुचक व अनुमोदक यांची नावे पुढीलप्रमाणे.

| **अ.क्र** | **उमेदवाराचे नांव** | **पत्ता** | **सुचकाचे नांव** | **अनुमोदकाचे नांव** |
|---|---|---|---|---|
| १) | मा.सुपे आशा रविंद्र | स.न.७६,भारतमातानगर दिघी, पुणे -१५. प्रभाग क्र.३१ अ, दिघी. | मा. वाळके चंद्रकांत (भाऊ) साहेबराव प्रभाग क्र.३१ ब, दिघी. | मा. गोफणे अनुराधा देवीदास प्रभाग क्र.३३ अ, गवळीनगर |

-------

( प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा) यांनी त्यांना प्राप्त झालेले उपरोक्त एकूण एक नामनिर्देशन पत्र मा.पीठासीन अधिकारी यांचेकडे सुपुर्त केले. मा.पीठासीन अधिकारी यांनी नामनिर्देशन पत्रांची छाननी केली.)

**पिठासन अधिकारी आयुक्त अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य पुणे -१** इ प्रभाग समिती सभापती पदासाठी मुदतीत प्राप्त एकच उमेदवाराचा एकूण एक नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात आली असून ते एक नामनिर्देशन पत्र वैध ठरविण्यात आले आहे. त्यामध्ये मा. इ प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणा-या मा.सुपे आशा रविंद्र या एक रितसर वैधपणे नामनिर्देशीत उमेदवार आहेत. उमेदवारास १५ मिनीटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस मा.पीठासीन अधिकारी यांचेकडे देऊन त्यांची उमेदवारी मागे घेता येईल.

(पीठासीन अधिकारी यांनी उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेला दुपारी ११.१५ ते ११.३० हा १५ मिनीटांचा कालावधी संपला.)

उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेल्या १५ मिनीटांच्या अवधीमध्ये मा.इ प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणा-या मा.सुपे आशा रविंद्र यांनी उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेल्या वेळेमध्ये उमेदवारी अर्ज रितसर मागे घेतला नसल्याने मा.सुपे आशा रविंद्र हया एकच रितसर वैधपणे नामनिर्देशीत उमेदवार आहेत.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – ४११ ०१८.**
मा.इ प्रभाग समिती

ठराव क्रमांक – ३९ विषय क्रमांक -१
दिनांक – १६/०१/२०१७ विभाग –इ प्रशासन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. इ प्रभाग समिती सभापती पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या व वैध ठरलेल्या मा. सुपे आशा रविंद्र नामनिर्देशन पत्रामधील मा.इ प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारी मा. सुपे आशा रविंद्र हया एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने मा. सुपे आशा रविंद्र यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीचे सभापती पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहिर करणेत येत आहे.

---------

यानंतर मा.पीठासीन अधिकारी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

श्री.नितीन पाटील
पिठासन अधिकारी तथा
आयुक्त, अपंग कल्याण,
महाराष्ट्र राज्य, पुणे -१

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – ४११ ०१८.**

मा.इ प्रभाग समिती

ठराव क्रमांक – ३९ विषय क्रमांक -१

दिनांक – १६/०१/२०१७ विभाग –इ प्रशासन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. इ प्रभाग समिती सभापती पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या व वैध ठरलेल्या मा. सुपे आशा रविंद्र नामनिर्देशन पत्रामधील मा.इ प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारी मा. सुपे आशा रविंद्र हया एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने मा. सुपे आशा रविंद्र यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीचे सभापती पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहिर करणेत येत आहे.

---------

यानंतर मा.पीठासीन अधिकारी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-
श्री.नितीन पाटील
पिठासन अधिकारी तथा
आयुक्त, अपंग कल्याण,
महाराष्ट्र राज्य, पुणे -१

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
इ प्रभाग समिती
भोसरी – ३९.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय भोसरी-३९
जा.क्रं/इ.क्षे.का/०४/कावि/१६८/२०१७
दिनांक - १६/०१/२०१७.

**प्रत –**

सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.